# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.लेखा/२९/कावि/०३ /२०२२ दिनांक :-०३ /०६/२०२२

### परिपत्रक

विषय : मनपातील विविध विभाग व अधिकारी यांच्या वाहन इंधनाबाबत.

मनपाच्या विविध विभाग व अधिकारी यांना मनपाकडून कार्यालयामध्ये येणेजाणेकरीता व कार्यालयीन कामास्तव फिरतीकरीता कार्यालयीन वाहन वाहनचालकासह उपलब्ध करून देणेत आलेले आहे. सदर उपलब्ध करून दिलेल्या वाहनास इंधनाकरीता र.रू १०,०००/- ते र.रू.२५,०००/- पर्यंत आगाऊ रक्कमा देण्यात आल्या असून त्याचे समायोजन करून पुन्हा आगाऊ रक्कमा दिल्या जातात. विभागाकडून सदर आगाऊ रकमेचे समायोजन करताना देयक तयार करून त्यासोबत वाहन इंधनाच्या पावत्या सादर कराव्या लागतात. त्यानुसार सदर देयकाच्या अनुषंगाने संबधीत विभागप्रमुखाच्या पदनामाच्या नावे धनादेश तयार करणेत येतो व सदरचा धनादेश क्रॉस कॅन्सल करून संबंधीत वाहनचालकास वाहन इंधनाकरीता रोख रक्कम बॅकेव्दारे दिली जाते. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये बराच वेळ जात असून वाहन चालकास वाहन इंधनाकरीता रक्कम मिळण्यास विलंब होऊन गैरसोय होत आहे. त्या अनुषंगाने सध्या चालू असलेल्या प्रचलित पध्दतीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

बॅक ऑफ बडौदा यांचेकडून वाहन इंधनाकरीता विभागांना प्रिपेड कार्डची सुविधा देणार असून संबंधीत विभागांच्या आवश्यक्तेनुसार खर्च मर्यादा देण्यात येणार आहे. विभागांनी प्रिपेड कार्ड सुविधा मिळणेकरीता लेखा विभागाकडे विभागाचा अर्ज व बॅकेकडील नमुन्यातील प्रिपेड कार्ड अर्ज भरून सादर करावयाचा आहे. सदर अर्जामध्ये विभागाचे नाव, वाहन क्रमांक, विभागाचा ई-मेल, वाहन चालकाचा मोबाईल क्रमांक, आवश्यक खर्च मर्यादा याचा उल्लेख करावयाचा आहे. प्राप्त अर्जानुसार संबंधीत विभागास प्रिपेड कार्डची सुविधा देणेत येईल त्यानुसार संबंधीत विभागाने त्या प्रिपेड कार्डचा वापर पेट्रोल पंपावर वाहन इंधन भरणेकरीता करावयाचा आहे. सदर परिपत्रकाची नोंद सर्व संबंधीत विभागांनी घेणेत यावी तसेच सर्व संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे.

27/05/22

( राजेश पाटील )
आयुक्त तथा प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति :- सर्व विभाग

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

# Baroda Reloadable Card Application

Date:

To
The Branch Manager,
PCMC Premises Branch
Pune

APPLICANTS' INFORMATION

| Sr. No. | Particular | | Information |
|---|---|---|---|
| 1 | Name In Full | : | Pimpri Chinchwad Municipal Corporation (PCMC) |
| 2 | Address | : | PCMC Main Builidng, Pune Mumbai Highway, Pimpri, Pune 411018 |
| 3 | Name of Department | : | |
| 4 | Name of Driver | : | |
| 5 | Vehicle Registration Number | : | |
| 6 | Mobile Number | : | |
| 7 | Email ID (विभाग) | : | |
| 8 | Purpose | : | Fresh Issuance [ ] OR Reload [ ] (URN of card ____________) |
| 9 | Card Amount | : | |
| 10 | Account number: | : | 31060200000001 |

We hereby authorize you to debit my account toward the amount to be loaded on the cards.

I/We hereby agree to abide by the terms, conditions, rules, regulations and other statutory requirements applicable to respective prepaid card. We also acknowledge that as part of purchasing this card, we will be visiting Bank's website www.bankofbaroda.com for accessing transaction and balance information.

Signature(s): ____________________

Signature of Driver/Card Acceptor: ____________________

PCMC Branch, Pimpri, Pune 411018
Email: drechi@bankofbaroda.com